POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२०१ ● मुंबई, रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## संशयास्पद इंजेक्शन आणि बरंच काही!

## गोरगरीब महिलांना पैशांचं आमिष दाखवून अंडाशयाची तस्करी

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

बदलापूर पुन्हा एकदा हादरलं आहे. चिमुरडी अत्याचार प्रकरणानंतर आणखी एक धक्कादायक व तितकाच संतापजनक प्रकार बदलापूरमध्ये समोर आला आहे. मानवी तस्करीचे खळबळजनक प्रकार आजवर अनेकदा उघडकीस आले आहेत. दर दिवशी गुन्हेगारीचं एक नवं कृत्य विचार करायचा भाग पाडत असताना आणि डोक्याचा झिणझिण्या आत असतानाच आता आणखी एका प्रकरणानं नागरिकांसह पोलीस यंत्रणेलाही धक्का दिला आहे. कारण ठरतंय ते म्हणजे बदलापूर इथं सुरू असणारं अंडाशयाच्या तस्करीचं रॅकेट.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी वेगानं तपासाची चक्रं फिरवली. यानंतर पोलिसांनी केलेल्या कारवाईत ज्युवेली गावात राहणाऱ्या सुलक्षणा गाडेकर, उल्हासनगरमधील साथीदार




अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे अशा तिघींनाही बेड्या ठोकल्या आहेत.

त्यांच्याकडून बदलापूर पोलिसांनी आरोपी सुलक्षणा गाडेकरच्या घरी छापेमारीची कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी महिलांच्या गर्भाशयासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शन्सचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोटी प्रतिज्ञापत्रं, महिलांचे फोटो आणि इतर संशयास्पद कागदपत्रे जप्त केली आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्या सुलक्षणा गाडेकर, उल्हासनगरमधील साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे यांसह सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांना २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरू असून यात आणखी काही धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता आहे.

संबंधित महिला आरोपी सुलक्षणा गाडेकर ही गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून इंजेक्शन्स देत होती. महत्त्वाची बाब म्हणजे ती डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बेकायदेशीरपणे महिलांची सोनोग्राफीही करवून घेत होती. गर्भाशयात स्त्री बिजाची वाढ झाल्यानंतर या महिलांना गाडेकर ही आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवण्यात येत होतं. त्याठिकाणी ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन गर्भाशयातील अंडाशय काढण्यात येत होतं.




### ३०० पीडित महिला, एका अंडाशयामागे २० हजार रुपये बदलापूर तस्करी प्रकरणात धक्कादायक माहिती उघड

बदलापुरातील अंडाशय तस्करी प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या अंडाशय तस्करी प्रकरणातील मुख्य आरोपी सुलक्षणा गाडेकरला पोलिसांनी अटक केली आहे. ही महिला बदलापूरमधील गोरगरिब महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांचे अंडाशय विकण्यास भाग पाडत होती. या प्रकरणात पोलिसांनी सुलक्षणा गाडेकरसह उल्हासनगरातील तिची साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे या ३ महिलांना अटक केली. याप्रकरणाच्या तपासातून एकएक धक्कादायक माहिती उघड होताना दिसत आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणात ३०० हून अधिक महिला पीडित आहे. या सर्व महिलांना अंडाशयामागे २० हजार रुपये दिले जात होते. तर मध्यस्थ महिलांना प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येत होते अशी उघड झाली आहे. या अंडाशयांची केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये विक्री केली जात होती. पोलिसांनी मात्र या संपूर्ण तस्करी प्रकरणाबद्दल काहीही बोलण्यास नकार दिलाय. या अंडाशय तस्करी प्रकरणात अटक करण्यात आलेली मुख्य सूत्रधार सुलक्षणा गाडेकर ही बदलापुरातल्या खरवईतील नॅनो सिटीत राहत होती.

### कसा उघडकीस आला हा प्रकार?

बदलापूरमधील एका पीडित महिलेनं उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर रुग्णालयातील डॉक्टरांनी बदलापूर पूर्व आणि पश्चिम या दोन्ही पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवल्यानंतर ज्युवेली गावात राहणाऱ्या सुलक्षणा गाडेकर आणि तिची उल्हासनगरातील साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे अशा तिघांनाही पोलिसांनी अटक केली. अटक करण्यात आलेल्या या सर्वांना २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. बदलापूरच्या ज्युवेली गावातील नॅनो सिटी इथं सुलक्षणा गाडेकर ही महिला राहत असून, तिने गर्भाशयात स्त्री बीजाची वाढ होण्यासाठी लागणारे इंजेक्शन्स घरातच साठवले होते. गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून ती हे इंजेक्शन देत होती. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बेकायदेशीरपणे सोनोग्राफी देखील करवून घ्यायची. गर्भाशयात स्त्री बिजाची वाढ झाल्यानंतर अशा महिलांना गाडेकर ही आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवायची. तिथं ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन गर्भाशयातील अंडाशय काढलं जायचं. महिलांच्या शरीरातून काढण्यात आलेल्या या अंडाशयाची त्यानंतर सर्रासपणे विक्री करण्यात येत होती. पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावून सुलक्षणा गाडेकर हिच्यासह तिचे साथीदार अश्विनी चाबूकस्वार, मंजुषा वानखेडे यांना ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी गाडेकरच्या घरी धाड टाकून गर्भाशयासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शनचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोटी प्रतिज्ञापत्रं, महिलांचे फोटो आणि इतर संशयास्पद कागदपत्रे जप्त केली असून आता या तस्करीमध्ये नेमकं आणखी कोण सामील आहे याचाच शोध घेतला जात आहे.

## नागपुरात १२ वीचा केमिस्ट्री पेपर लीक!

### विद्यार्थिनीच्या वारंवार वॉशरूमला जाण्यामुळे आली शंका... मोबाईलमध्ये सापडला पुरावा

■**नागपुर। प्रतिनिधी,**

नागपुरात बारावीच्या केमिस्ट्री विषयाची प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर लीक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असून, विद्यार्थिनीचा मोबाईल जप्त करण्यात आला, अशी माहिती मिळाली. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका आणि संभाव्य उत्तरे सोशल मीडियावर फिरत असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

**गुन्हा नोंद आणि डिजिटल तपास**

सदर प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून व्हॉट्सॲप ग्रुप, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे तपासले जात आहेत.




पोलिसांचा सखोल तपास सुरू असून, पेपर नेमका कुठून लीक झाला आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे.

**पालक आणि विद्यार्थी प्रतिक्रिया**

परीक्षेदरम्यान अशा प्रकारचे गैरवर्तन उघडकीस आल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शैक्षणिक अधिकाऱ्यांनी नियम पाळण्याचे आणि परीक्षा केंद्रात नीतीमान वर्तणूक राखण्याचे आवाहन केले आहे.

**नेमके काय घडले?**

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, बुधवारी एका परीक्षा केंद्रावर १२ वीची केमिस्ट्रीची लेखी परीक्षा सुरू असताना एका विद्यार्थिनीवर पर्यवेक्षकांना संशय आला. ती वारंवार स्वच्छतागृहात जात असल्याने तिची तपासणी करण्यात आली, त्यावेळी तिच्याकडून मोबाइल फोन जप्त करण्यात आला. मोबाईल तपासल्यावर समोर आले की, एका व्हॉट्सॲप ग्रुपवर परीक्षा सुरु होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका आणि संभाव्य उत्तरे शेअर केली गेली होती. विद्यार्थिनीच्या निवेदनानुसार आणखी काही विद्यार्थ्यांची चौकशी सुरु झाली आहे. प्राथमिक तपासात एका खाजगी कोचिंग क्लासशी संबंधित व्यक्तीने पैशाच्या मोबदल्यात पेपर लीक केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस या आर्थिक देवाणघेवाणीचे धागेदोरे तपासत आहेत.

## साई मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने वेषांतर करून येतात अन् चोरी करून जातात

### आंध्रातील त्या टोळीने शिर्डी हादरली

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डीतील साईबाबांच्या मंदिरात संपूर्ण देशातून भाविक येत असतात. दररोज येथे हजारो भाविक दर्शन घेतात. मात्र आता शिर्डीतून भयंकर प्रकार समोर आला आहे.

शिर्डीच्या साईबाबा मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने कपडे बदलून भाविकांच्या गर्दीत मिसळून चोरीचा डाव आखणाऱ्या आंध्र प्रदेशातील टोळीचा शिर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. दोन महिला, एक पुरुष आणि एका बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून आरोपींकडून महागड्या कंपनीचे मोबाइल आणि रोख रक्कम जप्त केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



**भाविकांच्या वस्तूंची चोरी**

साई मंदिर परिसरात एका भाविकाची पर्स ब्लेडने कापली गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर सीसीटीव्हीच्या आधारे तपास करत असताना पोलिसांना चक्रावून टाकणारी माहिती समोर आली. काही महिला आणि पुरुष साई मंदिर परिसरात संशयास्पदरीत्या फिरताना सीसीटीव्हीत दिसून आले. या संशयितांना ताब्यात घेतले असता एक पुरुष आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. उर्वरित एक पुरुष, दोन महिला आणि एक अल्पवयीन बालक यांना ताब्यात घेण्यात आले.

**वेशांतर करून चोरी**

अटक करण्यात आरोपींच्या झडतीदरम्यान त्यांच्याकडून १० मोबाइल फोन, ११७० रुपये रोख रक्कम, ब्लेड्स आणि कटर तसेच अल्पवयीन बालकाकडूनही एक मोबाइल हस्तगत करण्यात आला आहे. यातील बालकाला तातडीने चिल्ड्रन होममध्ये दाखल करण्यात आले आहे. ही टोळी भाविकांसारखाच वेश परिधान करून गर्दीत मिसळत होती. महिलांनी सुरुवातीला पंजाबी ड्रेस घातला होता, तर नंतर साडी परिधान करून पुन्हा परिसरात वावरल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले. चोरट्यांची ही पद्धत पाहून पोलिसही अचंबित झाले. या वेशांतराच्या माध्यमातून पोलिस आणि मंदिर सुरक्षा रक्षकांची दिशाभूल करण्याचा त्यांचा डाव होता. मात्र पोलिसांच्या चाणाक्ष नजरेमुळे शिर्डीत या परप्रांतीय टोळीचा पदार्फाश झाला आहे.

**शिर्डी पोलिसांसमोर चोरीला आळा घालण्याचे आवाहन**

दरम्यान, साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातून हजारो भाविक दररोज शिर्डीत येत असतात. आधीच परप्रांतीय भिक्षेकऱ्यांचा विषय ऐरणीवर आलेला असताना आता शिर्डीत परप्रांतीय चोरट्यांच्या टोळ्या देखील सक्रिय असल्याचे समोर आले आहे. यामुळे या चोऱ्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान शिर्डी पोलिसांसमोर आता असणार आहे.

## घरफोडीचा गुन्हा उघड... १५ लाखांहून अधिक किंमतीचे ८३ मोबाईल जप्त

■**वसई। प्रतिनिधी,**

घरफोडीच्या गुन्हयाची उकल करुन १५ लाखापेक्षा जास्त किंमतीचे ८३ मोबाईल फोन हस्तगत करण्यात गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कामगिरी. अधिक माहितीनुसार विरार पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयातील फियार्दी श्री ऋषीकेश चेलाराम गुप्ता वय २४ वर्ष राहणार सुरेश ॲटो पेट्रोलपंपाच्या बाजूला, विरार फाटा, कन्हेर, विरार पूर्व, ता वसई, यांच्या शॉप नं ०७, प्रभाकर अपार्टमेंट, सिटी बार अँड रेस्टॉरंट समोर, चंदनसार रोड, विरार पूर्व या मोबाईल शॉप दुकानाचे दिनांक १६/०२/२०२६ रोजी रात्री ०८.०० वाजता ते दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजताचे सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने शटरच्या लॉकची कडी कशाने तरी तोडून दुकानात प्रवेश करुन २१,८६,०००/- रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल घरफोडी करुन चोरुन नेले होते.




नमुदची घरफोडी ही मोबाईल दुकानात झाली असल्याने अशा प्रकारचे मोबाईल दुकानात घरफोडी करण्याची गुन्हे पार्श्वभूमी असलेल्या रेकॉर्डवरील आरोपी पप्पु ऊर्फ अजमतअली मोहम्मदअली शेख याचा शोध घेत असताना गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सफौज / मनोज मोरे यांचे बातमीदाराकरवी नमुदचा गुन्हा हा नमुद आरोपीनेच केला असल्याचे तपासात निष्पन्न करुन गुन्हयाची उकल करण्यात आली.गुन्हयात निष्पन्न आरोपी पप्पु ऊर्फ अजमतअली मोहम्मदअली शेख, रा. धानिवबाग, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. भरोठीया, हेथमाली, डुमरियागंज, जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश , नमुद गुन्हयाची उकल केल्यानंतर आरोपीने गुन्हयात चोरलेले मोबाईल हे त्याने ट्रॅव्हल्स मधून कुरीअर व्दारे त्याचे मुळ गावी जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश येथे पाठवित असल्याचे माहीती प्राप्त करुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मोबाईल पैकी १५,४७,६१६/- रुपये किंमतीचे एकुण ८३ मोबाईल फोन जप्त करुन हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सपोनिरी/ सोपान पाटील, पोउपनिरी / संतोष घाडगे, सहाफौज / संजय नवले, मुकेश पवार, रविंद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, पोहवा / प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदिश गोवारी, दादा आडके, प्रशांत ठाकुर व राहूल कर्पे यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.

## भरवस्तीत धाडसी जबरी चोरी... १२ तासांत आरोपी जेरबंद

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी भरवस्तीत धाडसी जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस केले १२ तासांत जेरबंद. अधिक माहितीनुसार नवघर पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्रीमती कोकीला कुंजबिहारी पांडे, वय ६० वर्षे, ह्या जेष्ठ नागरीक महिला दि. १३/०२/२०२६ रोजी रात्रौ ०८.०० वा. च्या सुमारास सिध्दीविनायक बिल्डींग नंबर ०२, तलाव रोड, भाईंदर पूर्व ता. जि. ठाणे येथील त्यांच्या राहत्या घराच्या पहिल्या मजल्यावर आल्या असता अनोळखी इसम, वय २० ते २५ वर्षे, याने पाठीमागून येवून फियार्दी यांचे गळयातील सोन्याची चैन जबरदस्ती ने खेचली असता फियार्दी यांचे गळयातील सोन्याची चैन तुटुन खाली पडली त्यावेळी फियार्दी यांनी आरडा-ओरडा केला व त्यामुळे सदरचा अनोळखी इसम हा पळून गेला असल्याबाबतचा व्हीडीओ सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता व सदर बाबत फियार्दी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वर नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा जबरी चोरीचा प्रयत्नाचा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून तात्काळ सदरची माहिती मा. वरिष्ठांना देवुन मार्गदर्शनाखाली गुन्हयाचा तपास सुरु करुन एकूण २३ सी सी टी व्ही कॅमेरे तपासले व तांत्रिक परीक्षणाच्या आधारे नमूद गुन्हा इरफान हबीब मन्सुरी, वय २० वर्षे, याने केल्याची माहिती प्राप्त झाली त्यावरुन त्याचा शोध घेवून त्यांस ताब्यात घेवून तात्काळ सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मि. भा. व. वि. पोलीस आयुक्तालय, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. राहुल चव्हण पोलीस उप आयुक्त, परिमंडळ१, मा. श्री. सोहेल शेख, सहा. पो. आयुक्त, नवघर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/दत्तात्रय ढुमे (गुन्हे), तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/अमोल तळेकर, पोउनि/संपत आहेर, सफी/जयप्रकाश जाधव, सफौ/मधुकर सावंत, पोहवा/ संतोष पाटील, पोहवा/ भुषण पाटील, पोहवा/ सुरेश चव्हाण, पोहवा/ नवनाथ घुगे, पोहवा / सुरजसिंग घुणावत, पोहवा / ओंकार यादव, पोशि/ संकेत मगर, पोशि/नवनाथ पवार, पोशि/ उमेश अस्वार यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/अमोल तळेकर करीत आहे.

## महसूल विभागाचा ४० लाखांचा हायवा ट्रक चोरणारे आरोपी गजाआड!

■**भाईंदर। प्रतिनिधी,**

महसुल विभागाने जप्त केलेला ४० लाख रुपए किंमतीचा हायवा ट्रक चोरणारे आरोपी गजाआड, गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष १ यांची कामगिरी. अधिक माहितीनुसार दिनांक १४/०२/२०२६ रोजी अपर तहसिल कार्यालय, मिरा भाईंदर येथील नायब तहसिलदार श्री. प्रथमेश बबन भुर्के यांनी घोडबंदर येथे गस्त घालत असताना, बेकायदेशीररित्या गौण खनिजाची वाहतूक करणारा एक टाटा कंपनीचा हायवा ट्रक कारवाई करून जप्त केला होता. पुढील कारवाईसाठी सदर ट्रक अपर तहसिल कार्यालय, भाईंदर (प.) येथील सार्वजनिक रस्त्यावर उभा करून ठेवण्यात आला होता. दिनांक १४/०२/२०२६ ते १७/०२/२०२६ या कालावधीत कोणीतरी अज्ञात इसमाने सदरचा ट्रक आणि त्यातील १८,००० रुपये किमतीची ९ ब्रास गौण खनिज माती असा एकूण ४०,१८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करून नेला. या प्रकरणी भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष १ कडून या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू करण्यात आला. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने आरोपी १) मांगीलाल तुलसिरामजी प्रजापती, वय ५७ वर्षे, धंदा चालक, राहणार मुळगाव नयापुरा, तहसिल पचपुदरा, जि. बालोदरा, राजस्थान व २) इशाक मुसा शेख, वय ४० वर्षे, धंदा सुपरवायझर, राहणार ठाकुर मॉलच्या मागे, गावठाण, काशीमिरा, मिरारोड पूर्व, जि. ठाणे यांना वाहनासह नीलकमल नाका, काशिगाव येथून शिताफीने ताब्यात घेतले.

आरोपींकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी ट्रक मालक दशरथ मुरगेशन मुदलीयार याच्या सांगण्यावरून सदर चोरी केल्याचे स्वेच्छेने कबूल केले. आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरीला गेलेला ४०,००,०००/- रुपये किमतीचा १२ टायर टाटा हायचा ट्रक जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण) श्री. मदन बल्लाळ आणि गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, स.पो. नि. सचिन सानप, योगेश काळे, पो.उ.नि. उमेश भागवत, स.फी./ अशोक पाटील, संजय शिंदे, अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, संतोष लांडगे, पो.ह.वा/ मनोज चव्हाण, प्रशांत विसपुते, सचिन हुले, सुधीर खोत, पो.शि / धिरज मॅगाने, सौरभ इंगळे, गौरव बारी, लकी पवार व मसुब किरण आसवले यांनी केली आहे.

## डिजीटल अटकेची भीती दाखवून निवृत्त बँक अधिकाऱ्याची १.८३ कोटीची फसवणूक

■**मुंबई। प्रतिनिधी,**

डिजीटल अटकेची भीती दाखवून एका निवृत्त बँक अधिकार्याची १ कोटी ८३ लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पूर्व सायबर सेलने अज्ञात सायबर ठगाविरुद्ध फसवणुकीसह आयटीच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अटक होऊ नये म्हणून या निवृत्त अधिकार्याने त्याचे एफडी मोडले, बँकेतील कॅशसहीत दागिने विक्री करून सर्व रक्कम सायबर ठगांना पाठविल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार मुलुंड येथे राहत असून एका नामांकित बँकेतून निवृत्त झाले आहेत. जानेवारी महिन्यात त्यांना एका अज्ञात व्यक्तीने कॉल करून तो टेलिकॉम विभागातून बोलत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर सायबर ठगाने निवृत्त बँक अधिकाऱ्याला तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल अशून वरिष्ठ पोलीस अधिकारी तुमची चौकशी करणार आहेत. त्यामुळे तुम्ही




चौकशीला सहकार्य करावं, अशी विनंती केली होती. त्यानंतर काही वेळानंतर निवृत्त बँक अधिकाऱ्याला एका अज्ञात व्यक्तीने फोन करून गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी असल्याचे सांगून चौकशी सुरू केली. व्हिडीओ कॉलद्वारे निवृत्त बँक अधिकाऱ्याला विविध प्रश्ने विचारण्यात आली. तसेच त्यांच्या बँक खात्यासह इतर ठेवी आणि गुंतवणुकीबाबत देखील माहिती घेण्यात आली.

निवृत्त बँक अधिकाऱ्याला भीती वाटावी म्हणून गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी म्हणून फोन केलेल्या अज्ञात व्यक्तीने त्यांना सांगितले की, तुमच्याविरुद्ध घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून तुम्हाला कोणत्याही क्षणी अटक होईल. तसेच सध्या तुम्ही डिजीटल अटकेत आहात. त्यानंतर आरोपीने त्यांना बँक खात्यासह एमडी मोडून पैसे पाठविण्यास सांगितले. अटकेच्या भीतीने निवृत्त बँक अधिकाऱ्याने जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत टप्याटप्याने १ कोटी ८३ लाख रुपये आरोपीने दिलेल्या बँक खात्यात जमा केले. चौकशी संपताच तुम्हाला तुमची रक्कम परत मिळेल, असे आरोपीने निवृत्त बँक अधिकाऱ्याला सांगितले होते. मात्र रक्कम आरोपीच्या खात्यात पाठवल्यानंतर त्यांची चौकशी झाली नाही. तसेच गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी म्हणून फोन केलेल्या व्यक्तीने निवृत्त बँक अधिकाऱ्याच्या खात्यात ट्रान्स्फर केले नाही. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच निवृत्त बँक अधिकाऱ्याने पूर्व सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर पोलिसांनी अज्ञात सायबर ठगाविरुद्ध तोतयागिरी करून फसवणूक करणे आणि आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सध्या या गुन्ह्यांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भारताची घोडदौड आवश्यक




१६ ते २० फेब्रुवारी या कालावधीत देहलीतील भारत मंडपम् येथे पार पडलेला 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' हा जगातील सर्वांत महत्त्वाच्या एआय (कृत्रिम बुद्धीमत्ता) कार्यक्रमांपैकी एक! या परिषदेत १०० हून अधिक देशांचे प्रतिनिधी, जागतिक तंत्रज्ञान आस्थापनांचे प्रमुख, शास्त्रज्ञ आणि धोरणकर्ते एकत्र आले. अमेरिका आणि चीन यांसारख्या कृत्रिम बुद्धीमत्तेच्या क्षेत्रात आघाडीवर असलेल्या देशांपेक्षा विकसनशील; परंतु विकसित होऊ पहाणाऱ्या भारतात झालेल्या या परिषदेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून होते. औद्योगिक, संगणक, इंटरनेट, सामाजिक माध्यमे असे मोठे पालट जागतिक स्तरावर होत असतांना त्यांचा केवळ वापरकर्ता राहिलेला भारत कृत्रिम बुद्धीमत्तेच्या क्षेत्रात मागे राहू नये, यासाठी त्याला बाह्या सरसावणे अपरिहार्य ठरले होते. त्या दृष्टीनेही कृत्रिम बुद्धीमत्तेची (एआय) परिषद भारतासाठीही अत्यंत महत्त्वाची! एआय हा आजच्या काळातील सर्वांत वेगाने पालटणारा तंत्रज्ञानाचा भाग आहे, जी केवळ संगणकीय प्रणाली राहिलेली नसून मानवी क्रियाशीलता, देशाची अर्थव्यवस्था, सार्वजनिक धोरणे आणि सामाजिक पालट यांवर खोल परिणाम करणारा महत्त्वाचा घटक झाली आहे. प्रचंड मोठ्या माहितीचे तकार्धारित, वेगाने, गणितीय विश्लेषण करणे, कठीणातील कठीण प्रश्न क्षणार्धात सोडवण्याची अभूतपूर्व क्षमता या कृत्रिम बुद्धीमत्तेत आढळते, जी सद्यःस्थितीत अमेरिका-चीनसारख्या देशांच्या अधीन आ-हे. एआयच्या अनेकानेक चांगल्या-वाईट शक्यता लक्षात घेता तिच्यावर कोण्या एका अथवा काही जणांचे अधिपत्य असणे अत्यंत घातक आहे. हा धोका तज्ञांनी ओळखला आहे; म्हणूनच एआय क्षेत्रातील भारताचा सहभाग एआयच्या योग्य वापराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात पार पडलेली ही परिषद तंत्रज्ञानाचे वैश्विक नेतृत्व, वैश्विक धोरणे, मानवकेंद्रित एआय आणि सुरक्षित वापर या महत्त्वाच्या सूत्रांवर केंद्रित होती. भारतात बुद्धीवंतांची वानवा नाही, हे सुंदर पिचाई, सत्या नडेला, शंतनु नारायण, अरविंद कृष्णन् यांनी दाखवून दिलेलेच आहे. भारताने अद्याप चॅटजीपीटी, जेमिनी, डीपसीक असे एआयचे कोणतेही मोठे माध्यम बनवलेले नाही, तरी एआयच्या अनेक माध्यमांना अचूक बनवण्यात भारत आणि भारतीय यांचा मोठा वाटा आ-हे. १० कोटी भारतीय चॅटजीपीटीचा वापर करतात. ५६ टक्के भारतीय दैनंदिन जीवनात एआयचा वापर करतात. भारतातील ५६ टक्के स्वतःची प्रज्ञा वापरून कृत्रिम बुद्धीमत्तेला आका-र देत आहेत. त्यामुळेच एआयच्या क्षेत्रात भारताला महत्त्वाचे स्थान आहे. ही मनोउभारी भारतियांची निराशा टाळण्यासाठी योग्य असली, तरी भारतातील बुद्धीवंतांनी या क्षेत्रात काळगतीने दौडणे आणि एआयला योग्य वळण लावणे अपरिहार्य ठरले आ-हे. आजच्या घडीला भारत प्रभावी एआय माध्यम चालू करू शकतो कि नाही? हा प्रश्न नसून 'दैनंदिन जीवनात सर्व ठिकाणी त्याचा वापर होऊ शकतो का?', हा आहे. येत्या काळात एआय माध्यम किती प्रभावी आहे? यापेक्षा राष्ट्रीय स्तरावर, सहजतेने, अल्प मूल्यात आणि सध्या वापरात असलेल्या उपकरणांमध्ये त्याचा वापर होऊ शकतो का? हे महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने 'सर्वम् एआय'सारख्या भारतीय एआय प्रणालीचे महत्त्व जागतिक स्तरावर अधोरेखित झाले आहे. एआय परिषदेमुळे भारत केवळ ग्राहक नाही, तर कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर आणि तिचे व्यवस्थापन करणारा शिल्पकार म्हणून ओळखला जाईल, हे निश्चित! भारतात स्वातंत्र्यासाठी घडलेली क्रांती, स्वातंत्र्यानंतर घडलेली हरित आणि श्वेत क्रांती सोडली, तरी औद्योगिक, संगणक, इंटरनेट, सामाजिक माध्यमे अशा क्षेत्रांत भारत विलंबाने उतरला आ-हे. त्याचा परिणाम म्हणजे भारतियांचा मोठा माहितीसाठा आज अमेरिकेसारख्या देशात पडून आहे, ज्याचा अयोग्य वापर होत असल्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे येथून पुढे तरी हे टाळण्यासाठी भारत कृत्रिम बुद्धीमत्तेचे केंद्र व्हायला हवे. केवळ बुद्धीमत्ताच नाही, तर 'प्रज्ञा' हे भारताचे वैशिष्ट्य आ-हे. बुद्धीमत्तेसह अनुभव, आत्मचिंतन आणि संयम असलेली प्रज्ञा स्वतःसह समाजाचे कल्याण करते, जी जगाच्या पाठीवर केवळ भारतात निर्माण होते. त्यामुळेच भारताने संपूर्ण शक्तीनिशी एआयला योग्य वळण लावण्यासाठी या क्षेत्रात उतरायला हवे. थोडक्यात एआयवर काम करर्णाया भारतियांची कमतरता नाही; मात्र हे काम ते विदेशी आस्थापनांसाठी करतात. या क्षेत्रात भारतीय आस्थापनांनी उतरून स्वतःचा दबदबा निर्माण करणे आवश्यक आहे. एआय परिषदेत नोएडातील गलगोटिया विद्यापिठाने आणलेल्या चिनी 'रोबोडॉग'च्या प्रसंगावरून काँग्रेसचे राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा भारताची नाचक्की करत देशविरोधी भूमिका घेतली. 'बीबीसी'ने परिषदेतील गर्दीच्या नियमनावरून आणि 'द वायर'ने कथित दिखाऊपणावरून वावटळे उभी करत भारताची नाचक्की करण्याचा प्रयत्न केला. ध्रुव राठी अद्याप गप्प बसलेला आहे, हे आश्चर्य! राहुल गांधी यांच्या संधीसाधू राजकारणाचा प्रत्यक्ष प्रयत्न, तसेच बीबीसी, द वायर यांसारख्या भारतद्वेष्ट्या प्रसारमाध्यमांची धडपड म्हणजे भारताच्या एआय क्षेत्रातील उगवत्या सूयार्ला ग्रहण लावण्याचा प्रयत्न! आज या आणि अशा सारख्यांचे मोठे प्रस्थ कृत्रिम बुद्धीमत्तेच्या क्षेत्रात आहे. हिंदु धर्म, देवता यांच्यावरील टीका, टिपण्या सहजतेने एआयच्या आधारे शोधता येतात; परंतु पक्षपातीपणापासून स्वतःला वाचवण्यासाठी अन्य कोणत्याही पंथांसंदर्भातील या विषयाला कृत्रिम बुद्धीमत्ता सहजतेने हात घालत नाही. याला कारण म्हणजे कृत्रिम बुद्धीमत्तेचे निर्माते 'डीप स्टेट'च्या अधीन असण्याची शक्यता अधिक आहे. इंटरनेट अथवा एआय यांच्याकडे भारत, हिंदु धर्म, संस्कृती, हिंदूंचा इतिहास यांविषयीची खरी माहिती अभावानेच आढळते. त्यात हिंदुविरोधी कथानकांचा सुळसुळ-ाट असल्याने योग्य माहिती मिळणे आणखी दुर्लभ हे लक्षात घेऊन काही राष्ट्रनिष्ठ, हिंदु धर्मनिष्ठ तंत्रज्ञ एआयला योग्य माहिती पुरवत आहेत; परंतु तितके पुरेसे नाही. त्यासाठी भगीरथ प्रयत्नांची आवश्यकता आहे. ह्यएआयह्ला योग्य वळण लागण्यासाठी त्याचे प्र्ज्ञेत रूपांतर होणे आवश्यक आहे, जे कार्य केवळ संस्कृतीनिष्ठ भारतीय करू शकतात, हे निश्चित!

# वाढत्या शहरांना हवे आहे हिरवे छत्र

दुसरी आंतरराष्ट्रीय आर्बोरिकल्चर परिषद २०२६ पूर्व-परिषद कार्यशाळा ६ मार्च २०२६ रोजी, तर मुख्य परिषद ७-८ मार्च २०२६ या कालावधीत मुंबईत विलेपार्ले पूर्व येथील सहारा स्टार हॉटेलमध्ये होत आहे. त्यानिमित्ताने शहरातील हिरवाईच्या अभावाचा लेखाजोखा.



प्रत्येक पावसाळ्यात मुंबईत आपण तेच दुःखद दृश्य पाहतो. एखादे झाड गाडीवर कोसळते. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघतो. उंच इमारती, रुंद रस्ते वेगाने बांधण्याच्या आपल्या कामात खंड पडत नाही. आपण तीच चूक वारंवार करत राहतो. झाडांकडे सजावट, अडथळा म्हणून पाहतो. ती शहरी पायाभूत सुविधा आहे हेच विसरतो.

भारत अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करतो आहे. २०४७ पर्यंत आपल्या अध्यार्हून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर त्यांचा झपाट्याने कायापालट होत आहे. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाकरिता आपण एक मोठी किंमत मोजत असतो. ती प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही.

वृक्ष संवर्धनाचा आग्रह धरणाऱ्यांचे म्हणणे भारतातील नियोजक, अभियंते, महापालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. झाडांचे योग्य व्यवस्थापन केल्यास ती विकासाभिमुख आहेत.

## आर्बोरिकल्चर म्हणजे नक्की काय आणि काय नाही?

मी आर्बोरिस्ट आहे असे सांगितले की, अनेकदा समोरचा प्रतिसादादाखल विनम्रपणे मान डोलवतो आणि मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो असा समज करून घेतो. विकेंडला कुंपण छाटतो, असा समज करून घेतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे.

आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष-प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे याच्याशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो.

एक प्रौढ झाड कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी करते, जैवविविधता टिकवते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर सकारात्मक परिणाम घडवते.

## झाडे विकासाच्या विरोधात नाहीत, योग्य व्यवस्थापन गरजेचे

मुंबई आर्बोरिकल्चरची आव्हाने सर्वांत तीव्र स्वरूपात मांडते. हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे. जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याचवेळी अखंड पायाभूत सुविधांच्या दबावाखाली असलेले हे शहर आहे.

गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. पण अनेक झाडे वाचवता आली असती. झाड वाचवणे आणि झाड तोडणे हा बऱ्याचदा नियोजनाच्या टप्प्यातील निर्णय असतो. प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेच्या बैठकीत होता का?

मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामामुळे झालेले नुकसान यामुळे झाडे धोकादायक बनतात. कमकुवत झालेले झाड डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते. पण एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून झाडाचे जोखीम मूल्यांकन करून घेणे हे खर्चिक नाही. ती सार्वजनिक सुरक्षा आहे.

शास्त्र प्रत्यक्षात कसे दिसते

२०२१ मध्ये माझी संस्था ट्रीकोटेक एलएलपी आणि यूकेमधील बॅरेल ट्री कन्सल्टन्सीचे जेरेमी बॅरेल यांच्यासह चेन्नई येथील एका शाळेच्या बांधकाम स्थळावर १०० वर्षे जुना वटवृक्ष जतन करण्याचे काम मला मिळाले. हा वटवृक्ष बांधकाम क्षेत्राच्या थेट आतमध्ये होता. विकासकाची पहिली प्रतिक्रिया होती की, झाड तोडा. त्याऐवजी आम्ही सविस्तर वृक्ष मूल्यांकन केले. मुळांचे आराखडे नोंदवले, संरचनात्मक स्थिती तपासली, बांधकामाचे परिणाम मांडले. तो वटवृक्ष आजही उभा आहे, जिवंत आहे, त्या शाळेच्या अंगणात. त्याखाली शिकणाऱ्या मुलांना माहीतही नाही की, तो जवळजवळ संपण्याच्या उंबरठ्यावर होता. माझ्यासाठी यशस्वी आर्बोरिकल्चर असेच आहे.

दुसऱ्या टोकाला, ट्रीकोटेकने मुंबईजवळ डेटा सेंटर उभारू पाहणाऱ्या एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीसाठी ९०० हून अधिक झाडांचे वृक्ष-प्रभाव मूल्यांकन अलीकडेच पूर्ण केले. सविस्तर स्थिती सर्वेक्षण, सरकारी परवानग्यांसाठी कायदेशीर मदत हे या कामाचे स्वरूप होते.

व्यावसायिक आर्बोरिकल्चर महागडा अव्यापारेषु व्यापार नाही. एक झाड कोसळण्याच्या घटनेतून होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान, दिवाणी खटले आणि कोट्यवधींचे नुकसान होऊ शकते.

जोखीम कमी करण्यापलीकडे, रस्त्यावरील झाडे व्यावसायिक मालमत्तेचे मूल्य पाच ते पंधरा टक्क्यांनी वाढवतात. हरित मार्गिका शहरातील उष्मा कमी करतात. इमारतींचा थंडाव्यासाठी लागणारा ऊर्जाखर्च घटतो.

## जागतिक संवाद, मुंबईत रुजलेला

भारताला हे शास्त्र नव्याने शोधण्याची गरज नाही. यूके, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, अमेरिका आणि युरोपमध्ये प्रगत आर्बोरिकल्चर अस्तित्वात आहे. आपण त्यांच्या अनुभवातून शिकू शकतो, त्यांच्या पद्धती अंमलात आणू शकतो.

अमेनिटी ट्री केअर असोसिएशन नानाजी देशमुख प्रतिष्ठानच्या सहकार्याने मुंबईत दुसरी तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय आर्बोरिकल्चर परिषद २०२६ आयोजित करत आहे. ६ मार्च २०२६ रोजी पूर्व-परिषद कार्यशाळा आयोजित केली आहे. यामध्ये बांधकामात झाडे कशी टिकवायची यावरील कार्यशाळा होणार आहे. क्एर कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वांद्रे पश्चिम, मुंबई येथे होणाऱ्या या कार्यशाळेत जेरेमी बॅरेल, व्यवस्थापकीय संचालक, बॅरेल ट्री कन्सल्टन्सी, यूके हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. आपल्या आजूबाजूची झाडे ही दुसरी कार्यशाळा महाराष्ट्र निसर्ग उद्यान, धारावी, मुंबई येथे होणार असून त्यामध्ये मार्गदर्शक डॉ. प्राची गुप्ता, अझीम प्रेमजी विद्यापीठ, बंगळुरू या आहेत.

दि. ७-८ मार्च २०२६ दरम्यान मुख्य आंतरराष्ट्रीय परिषद सहारा स्टार हॉटेल, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे होत असून परिषदेचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे "वाढती शहरे, हिरवे छत्र." यावर मार्गदर्शन करतील.

मुख्य परिषदेच्या दोन दिवसांत मुंबई ग्रीनवेचे सहसंस्थापक वास्तुविशारद अलन अब्राहम आणि अभिनेत्री व संयुक्त राष्ट्र पर्यावरण सदिच्छादूत दिया मिर्झा यांची मुख्य भाषणे होतील. अमेरिकेतील आर्बर डे फाऊंडेशनचे उएड डॅन लॅम्बे, आर्बोरिकल्चर ऑस्ट्रेलियाचे कार्ल डाला रिवा, टेनेसी विद्यापीठाच्या डॉ. शेरॉन जीन-फिलिपे, ग्रीहिलचे उएड गॅबोर गोट्झी आणि डॉ. संग्राम चव्हाण, डॉ. स्मिता हेगडे, डॉ. विजय मोरस आणि आर्किटेक्ट शिल्पा गवाणे यांसारखे देशी, विदेशी तज्ञ मार्गदर्शन करतील.

# फुकट ते पौष्टिक!



तामिळनाडूमध्ये निवडणुकीच्या तोंडावर सरसकट मोफत वीज देण्याच्या धोरणावरून सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला तर फटकारलेच; त्याशिवाय देशभरातील सर्वच राज्य सरकारांच्या या रेवडी धोरणालाही न्यायालयाने धारेवर धरले आहे. अर्थात, या कानउघाडणीचा राजकीय पक्षांवर किती परिणाम होणार, हा प्रश्नच आहे; कारण कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी काही दिवसांपूर्वीच तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी लाडकी बहीण योजनेचा तमिळ अवतार असलेल्या योजनेअंतर्गत तीन महिन्यांची आगाऊ रक्कम आणि भरीला दोन हजार रुपयांचा घसघशीत बोनसही दिला आहे. देशाच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये विविध अशा योजनांमुळे सरकारी तिजोरीवर ताण येऊन अर्थव्यवस्थाही अडचणीत येते आणि विकासकामांसाठी सरकारकडे पैसे राहत नाहीत, असे निरीक्षण नोंदवले; तसेच अशा योजनांमुळे राज्ये कर्जाच्या खाईत जातील, असा इशारा रिझर्व्ह बँकेनेही दिला आहे. विविध राज्यांची उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा राज्यांचे कान टोचले आहेत. परंतु, मतांचे पीक काढण्यासाठी शेतकरी, महिला अशा घटकांना लक्ष्य करून राजकीय पक्षांची रेवड्यांची पेरणी जोमात सुरू आहे. खरे तर सामाजिक कल्याणाचा उद्देश ठेवून स्वातंत्र्यानंतर अशा योजनांना सुरुवात झाली आणि तमिळनाडूच त्यांची जननी आहे. शाळेत मध्यान्ह भोजनेच्या योजनेमुळे शिक्षणाचा स्तर सुधारला; पुढे ही योजना देशभरात लागू झाली. सत्तरच्या दशकात त्याच राज्यात एका रुपयात साडेचार किलो तांदूळ मिळू लागला. पुढे एम. जी. रामचंद्रन, करुणानिधी, जयललिता; तसेच आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी साड्या, टीव्ही, स्मार्टफोन, सायकली, वॉशिंग मशिन आणि लॅपटॉप असे इमले चढवले. पुढे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात रोख रकमा देण्याने या सर्वांवर कडी केली. सध्या तर जवळपास सर्व राज्ये आणि सर्व पक्ष या रेवडीच्या मायाजालात सापडले आहेत. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड आदी राज्ये बहिणींना दरमहा ओवाळणी घालतात. कर्नाटकात मोफत लाभ देणाऱ्या पाच योजना आहेत. बिहारमध्ये निवडणुकीच्या तोंडावर सुमारे दीड कोटी महिलांना प्रत्येकी दहा हजार रुपये मिळाले. दिल्ली, पंजाब आणि राजस्थानसारखी राज्ये मोफत वीज पुरवत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांच्या अशा योजनांवर टीका करून 'रेवडी संस्कृती' संपवण्याची गर्जना केली खरी; पण स्वतः केंद्र सरकारही मोफत धान्य, सिलिंडर आणि शेतकऱ्यांच्या खात्यांवर रोख रकमांचा नियमित वर्षाव करते आणि रेवड्या उधळणाऱ्या भाजपशासित राज्यांनाही त्यांनी रोखल्याचे ऐकिवात नाही. महाराष्ट्रात पूर्वी अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण आल्याने शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवण्याची योजना सहा महिन्यांतच गुंडाळावी लागली होती. मोफत विजेपोटी एक तर सरकारला अनुदान द्यावे लागते किंवा उर्वरीत ग्राहकांच्या वीजदरांत वाढ होते; तसेच मनमानी उपसा होऊन भूजलसाठाही घटल्याचे अनुभव आहेत. विशेषतः महाग विजेला कंटाळून उद्योगांनी राज्यातून स्थलांतर केल्याने हजारो रोजगार बुडतात. केंद्र सरकारवरही दोनशे लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यामध्ये या रेवडी योजनांचा सुमारे वीस टक्के वाटा असावा, असा अंदाज आहे. मात्र, या कशाचीही जाणीव न ठेवता अर्थव्यवस्थेला खड्डयात लोटून, प्रसंगी कर्ज काढूनही अशा योजनांना सोस का कमी होत नाही, याचाही विचार झाला पाहिजे. अशा योजनांना भुलून नागरिक प्रचंड बहुमत मिळवून देतात, ही त्यामागील कटू वस्तुस्थिती आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'ने केलेल्या सर्वेक्षणात ४२ टक्के नागरिकांनी रोकड किंवा भेटवस्तू हे मतदानामागील प्राधान्य असल्याचे आढळले होते.

# वचने पूर्ण करण्याची क्षमता खरंच आहे का?

मुंबई मनपाची आर्थिक स्थिती पाहता, दिलेली वचने पूर्ण करण्याची क्षमता भाजपमध्ये खरंच आहे का? की विसरशील खास मला दृष्टीआड होता... असं म्हणण्याची वेळ मुंबईकरांवर येणार?




भाजपचा महापौर मुंबईत १९८२ नंतर विराजमान झाला. या यशाच्या उत्साहात एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो निवडणुकीत दिलेली वचने, "महिलांसाठी बेस्ट बस सवलत, पाणी दरवाढीस स्थगिती, झोपडपट्टीमुक्त मुंबई, क्लायमेट कृती आराखडा प्लॅन आदी" कशी पूर्ण होणार? मुंबई मनपाची आर्थिक स्थिती पाहता, आधीच ठेवी कमी होत असताना आणि मेगा प्रोजेक्ट्सच्या दबावात, ही वचने पूर्ण करण्याची क्षमता भाजपमध्ये खरंच आहे का? की विसरशील खास मला दृष्टीआड होता...वचने ही गोड गोड देशी जरी आता (निवडणूक वचननाम्यात) असं म्हणण्याची वेळ मुंबईकरांवर येणार?

मुंबई ही देशातील आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई मनपा ही सर्वात श्रीमंत महापालिका. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात रु.७४ हजार ४२७ कोटींची तरतूद आहे, ज्यात भांडवली खर्च रु.४३ हजार १६२ कोटी (५८%) आणि महसुली खर्च रु.३१ हजार २०४ कोटी (४२%) आहे. हे आकडे आकर्षक असले, तरी राखीव निधी रु.८१ हजार ७७४ कोटींवरून गेल्या पाच वर्षांत रु.१० ते रु.१२ हजार कोटींनी कमी झाला. वचनबद्ध दायित्वे रु.२.३२ लाख कोटी आहेत, ज्यात रस्ते, पूल, सांडपाणी प्रकल्पांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत भाजपच्या वचननाम्याची अंमलबजावणी कशी होईल? त्यांच्या पूर्ततेसाठी आवश्यक आर्थिक तरतुदी आणि वास्तविक आव्हाने पाहता, शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

भाजपने (महायुतीच्या माध्यमातून) जानेवारी २०२६ मध्ये जाहीर केलेला वचननामा मुख्यतः महिलांच्या विकास, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि सामाजिक कल्याणावर केंद्रित आहे. पण प्रत्येक वचनाची पूर्ती करण्यासाठी किती खर्च लागेल आणि मुंबई मनपाच्या सध्याच्या आर्थिक स्थितीत ते शक्य आहे का?

## वचने ही गोड गोड

महिलांसाठी बेस्ट बस सवलत आणि परिवहन सुधारणा करण्याचे वचन भाजपने दिले होते. वचननाम्यात बेस्ट बसमध्ये महिलांसाठी ५०% सवलत (एसटीप्रमाणे) आणि बेस्ट बस दुप्पट करणे (पाच हजार ते १० हजार बस, पूर्ण इलेक्ट्रिक २०२९ पर्यंत) याचा समावेश आहे. बेस्टचा वार्षिक तोटा सध्या रु.२ हजार २०० कोटी आहे आणि मुंबई मनपाकडून अनुदान रु.१ हजार कोटी. ५०% सवलतीमुळे अतिरिक्त अनुदान रु.५००-१,००० कोटी प्रति वर्ष लागेल. पाच वर्षांत रु. पाच-दहा हजार कोटी. बस विस्तारासाठी आणखी रु.१० हजार कोटी म्हणजे एकूण रु.१५ ते २० हजार कोटी! मुंबईची वाहतूककोंडी आणि प्रदूषणाच्या समस्या पाहता, हे वचन पूर्ण न झाल्यास जनतेचा विश्वास उडेल.

पाणी दरवाढीस स्थगिती आणि पाणीपुरवठा सुधारणा करण्याचे वचन भाजपने निवडणुकीत दिले आहे. पाणी दरात दरवर्षी ८% वाढ होते, पण वचनानुसार पाच वर्षांसाठी पाणी दरवाढीस स्थगिती याशिवाय टँकर माफिया मुक्त मुंबई आणि पाणी प्रकल्प (गारगाई , पिंजाळ) पूर्ण करणे. पुढील पाच वर्षे पाणी दरवाढीस स्थगिती दिल्यामुळे उत्पन्नात रु. एक ते दोन हजार कोटी प्रति वर्ष कमतरता येईल. पाच वर्षांत रु. पाच ते दहा हजार कोटी कमतरता. त्यात पाणीपुरवठा प्रकल्पांसाठी अतिरिक्त खर्च. मुंबई मनपाच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत मालमत्ता कर आणि पाणी कर आहेत. पाच वर्षे पाणी दरवाढीस स्थगिती दिल्यास इतर स्रोतांतून ही कमतरता भरून काढावी लागेल, मुंबईत पाणीटंचाई ही मोठी समस्या आहे. गेल्या वर्षी पाणीपुरवठ्यात १५% कमतरता होती. जर राखीव निधी कमी होत असेल, तर नवीन प्रकल्प कसे पूर्ण होतील? क्लायमेट कृती आराखडा प्लॅन आणि पर्यावरण सुधारणा करणार असे वचन भाजपने दिले आहे. रु.१७ हजार कोटींचा क्लायमेट कृती आराखडा प्लॅन, खड्डेमुक्त रस्त्यांची मुंबई (रस्ते काँक्रीटीकरण), शून्य कचरा वॉर्ड, हरित मुंबई आदी आश्वासने दिली आहेत. यासाठी रु.१७ हजार कोटी (पाच वर्षांसाठी), दरवर्षी रु. तीन ते चार हजार कोटी लागतील. यात पावसाळ्यात मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून योजना, वीज निर्मिती आणि कचरा निर्मूलन समाविष्ट असेल. मुंबई मनपाच्या २०२५-२६ बजेटमध्ये पर्यावरण संबंधी खर्च रु.१७ हजार ०६७ कोटी (भांडवली) आणि रु.३ हजार २६९ कोटी (महसुली) आहे, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी केवळ ४०% प्रकल्प पूर्ण झाले आहेत. झोपडपट्टीमुक्त मुंबई आणि गृहप्रकल्प, पाच वर्षांत झोपडीमुक्त आणि पागडीमुक्त मुंबई, ४० लाख परवडणारी घरे, धारावी पुनर्वसन आणि विस्तार अशी वचने दिली आहेत. मुंबई मनपाच्या वचनबद्ध दायित्वामध्ये आधीच रु.८८ हजार कोटी रस्ते/ब्रिजेससाठी. त्यात मुंबईत ४०% लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प गेल्या दहा वर्षांत केवळ २०% यशस्वी झाले. महिलांसाठी आर्थिक योजना आणि तंत्रज्ञान वापर करताना लाडकी बहीण योजना विस्तार (रु.५० लाखांपर्यंत व्याजमुक्त कर्ज), मुंबई डिजिटल सखी (एआय/कोडिंग कोर्स), एआय वापरून अवैध स्थलांतरित ओळखणे आदी बाता मारल्या आहेत. यासाठी एक ते पाच हजार कोटी (वार्षिक कर्ज/योजना), एआय प्रोजेक्ट्ससाठी रु.१००-५०० कोटी उभे करावे लागतील. हे वचन महिलांच्या सक्षमीकरणावर आहे, पण मुंबई मनपाच्या महसुली खर्चात आरोग्य आणि शिक्षणासाठी आधीच निधी कमी पडत आहे (रु.७ हजार ३८० कोटी आरोग्य). मग मुंबई मनपा स्वतंत्र निधी कसा उभारेल? अवैध स्थलांतरित ओळखणे हे राजकीय आहे, पण त्याची अंमलबजावणी कायद्याच्या विरोधात जाऊ शकते.

## आर्थिक स्थिती आणि आव्हाने

मुंबई मनपाचे बजेट अनेक राज्यांपेक्षा (गोवा, अरुणाचल, सिक्कीम) मोठे आहे, पण खचार्ची पद्धत पायाभूत सुविधांवर अधिक आहे. भांडवली खर्च ५८% आहे, ज्यात रस्ते रु.३ हजार ३६५ कोटी, पूल रु.२ हजार ९४० कोटी, सांडपाणी रु.३ हजार ७६७ कोटी. पण प्रभाग स्तरावर केवळ १४-२४% बजेट जाते, ज्यामुळे दैनंदिन सेवा (स्वच्छता, पाणी) प्रभावित होतात. ठेवी रु.८० हजार-८१ हजार ७७४ कोटी आहेत, पण गेल्या वर्षांत घट झाली. त्यामुळे तूट येण्याची शक्यता आहे आणि मुंबई मनपा पहिल्यांदाच म्युनिसिपल बॉण्ड्स जारी करणार आहे. महायुतीच्या वचनांसाठी पाच वर्षांत रु.१-१.५ लाख कोटी अतिरिक्त तरतूद लागेल. पण वचनबद्ध दायित्व रु.२.३२ लाख कोटी आहेत. सबसिडी (बेस्ट, पाणी) मुळे रिझर्व्ह आणखी कमी होतील. नवीन महापौर रितू तावडे "सेवक म्हणून काम करेन" म्हणतात, पण पारदर्शकता कशी राहील? मागील प्रशासक राजवटीत (४ वर्ष) मुंबई मनपाने मोठ्या प्रकल्पावर लक्ष केंद्रित केलं, पण सामान्य मुंबईकरांना फायदा कमी झाला. मार्च २०२२ ते जानेवारी २०२६ या सुमारे चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीत मुंबई मनपाच्या पैशांची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी झाली. २०२१-२२ मध्ये मुंबई मनपाचा राखीव निधी रु.९१ हजार ६९० कोटी इतका होता. २०२१-२२ ते २०२४-२५ पर्यंत त्यात रु.१२ हजार १९२ कोटींची घट झाली. २०२५-२६ अर्थसंकल्पामध्ये राखीव निधी रु.८१ हजार ७७४ कोटी दाखवला, पण त्यानंतर आणखी रु. दोन हजार कोटी कमी झाले. २०२५ अखेर रु.७९ हजार ४९८ कोटींपर्यंत राखीव निधी खाली आला. मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी या ठेवी मोडल्या असे सांगण्यात आले. ज्यात कोस्टल रोड, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, एमएमआरडीएला निधी वळवणे, सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी निधी वापरणे, अशी कारणे देण्यात आली.

महापालिकेत ठाकरेंची सत्ता आली असती तर आधी श्वेतपत्रिका काढायला लावणार होते, मात्र आता ती शक्यता धुसर आहे. भाजपची वचने महत्त्वाकांक्षी आहेत, पण मुंबई मनपाच्या आर्थिक दबावात ती पूर्ण होण्याची शक्यता कमी दिसते. मुंबईकरांनी सतर्क राहावे. विरोधक म्हणून ठाकरेंचे अनुभवी पाहारेकरी लक्ष ठेवून असतीलच. सामान्य मुंबईकरांना विसरशील खास मला..म्हणण्याची वेळ येणार आहे हे मात्र निश्चित!!

## उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.

**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



## या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



### कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

- कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.
- rq मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

### पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

- एक पीच आणि  टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.
- यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.
- तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.
- अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

### ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

- एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.
- त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.
- या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.
- त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.
- हा उपाय नियमित करा.





## केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.



उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो. उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

## ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

सकाळी उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवानाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते.  क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.



## पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पयार्यापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.



**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

## बिटाच्या अतिसेवनाने होऊ शकतात दुष्परिणाम

**बीट** ही भाजी शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगली समजली जाते. पण आरोग्याच्या दृष्टीने एखादा पदार्थ कितीही चांगला असला, तरी त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम उद्‌भवू शकतात. बिटाच्या अतिसेवनाने देखील शरीरावर काही दुष्परिणाम दिसून येण्याची शक्यता असते. हे दुष्परिणाम कोणते आहेत, ते जाणून घेऊ या. बिटाच्या अतिसेवनाने 'गाऊट' किंवा किडनी स्टोन्स सारख्या समस्या उद्‌भवण्याची शक्यता असते. तसेच बिटाच्या रसाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये लोह, कॉपर, मॅग्नेशियम, लिव्हरमध्ये साठत राहून त्यामुळेही समस्या उद्‌भवू शकतात.

बिटाच्या अतिसेवनामुळे 'बीट-युरिया' दिसून येण्याची शक्यता असते. लघवीचा सामान्य रंग बदलून तो बिटाप्रमाणे लालसर होणे हे बीट-युरियाचे लक्षण आहे. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, त्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक उद्‌भवते. ही समस्या फारशी गंभीर नसली, तरी यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बिटामध्ये 'ऑक्सलेट' मुबलक मात्रेमध्ये असून यांच्या अतिसेवनाने किडनी स्टोन्स होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये आधीपासूनच किडनी स्टोन्सची समस्या असते, त्यांना बीट आहारातून कमी करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच ज्यांना 'गाऊट' हा विकार असेल, त्यांनाही बीट आहारातून वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो.



बिटाच्या अतिसेवनाचे आणखी एक लक्षण म्हणजे शरीरावर येणारे बारीक पुरळ. हे लक्षण सामान्य नसून, अतिशय अभावानेच आढळते. बिटाच्या अतिसेवनाने अंगावर बारीक पुरळ उठणे, शरीरावर लालसर चट्टे उठणे, खाज सुटणे, आणि क्वचित थंडी वाजून ताप येणे अशी लक्षणेही पाहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे बिटाचे सेवन केल्यानंतर आवाज बसण्याची समस्या दुर्मिळ असली, तरी पाहिली गेली आहे. बिटाच्या अतिसेवनाने पोटामध्ये गॅसेस होऊन पोटदुखी उद्‌भवू शकते. तसेच पोट फुगणे, बद्धकोष्ठ याही समस्या बिटाच्या अतिसेवनाने उद्‌भवू शकतात.

## उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या '५' टीप्स



**उन्हाळ्याच्या दिवसांत घामामुळे डोक्याला खाज येणं, केसात कोंडा वाढणं हा त्रास हमखास आढळतो. उन्हाळ्यात त्वचेची, आरोग्याची काळजी घेतली जाते. पण केसांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. परिणामी अनेक छुपे त्रास किंवा त्वचा विकार वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच शुष्क आणि फ्रिझी केसांची नेमकी काळजी कशी घ्यावी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.**

**उन्हाळ्याच्या** दिवसात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता यामध्ये बदल होत असल्याने केस अधिक शुष्क होतात. उन्हाळ्याच्या दिवसात घाम येण्याचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे टाळूजवळील त्वचा अधिक चिकट होते. त्याचा परिणाम केसांवरही जाणवतो.

- उन्हाळ्याच्या दिवसात किमान २-३ वेळा केस स्वच्छ धुवावेत. नियमित केस धुणे शक्य नसेल तर एक आड एक दिवस केस स्वच्छ धुवावेत. यामुळे केस चिकट होणार नाहीत.
- केस धुण्यासाठी माईल्ड किंवा हर्बल शाम्पू वापरा. केमिकलयुक्त शाम्पूमुळे केसांचे अधिक नुकसान होते. तुम्हांला डॅण्डरफचा त्रास असेल तर ॲण्टी डॅण्डरफ शाम्पू वापरा.
- शाम्पूने केस धुतल्यानंतर चांगल्या दर्जाचे कंडिशनरही वापरा. टाळूवर कंडिशनर लावू नका. शक्य असेल तर लिव इन कंडिशनर वापरा. यामुळे सूर्याच्या प्रखर किरणांप्रमाणेच प्रदूषणामुळे केसांचे होणारे नुकसान टाळण्यासही मदत होते.
- उन्हाळ्याच्या दिवसात केसांची चमक आणि पोत सुधारण्यासाठी ॲप्पल सायडर व्हिनेगर फायदेशीर ठरते. या घरगुती उपायासाठी दोन टीस्पून ॲप्पल सायडर व्हिनेगर एक लिटर पाण्यामध्ये मिसळा. केस शाम्पूने धुतल्यानंतर केस या पाण्यानेही स्वच्छ धुवा.
- तुमचे केस मोकळे सोडणार असाल तर सनस्क्रीनयुक्त हेअर कंडिशनर आणि सेरम वापरा. यामुळे घामाने केस चिकचिकीत होण्याची शक्यता कमी होते. यामुळे केस रफ आणि विस्कटलेले दिसण्याची शक्यता कमी होते.



## बद्धकोष्ठ दूर करण्याकरिता प्या मूग आणि पालकाचे सूप



**आपल्या** भोजनाच्या सवयी, आपला आहार आणि आपल्या शरीराला दिवसभरामध्ये होत असणारा व्यायाम, हालचाल, या गोष्टींवर आपण खात असलेल्या अन्नाचे पचन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. जर पचनक्रिया सुरळीत नसेल, तर अपचन, बद्धकोष्ठासारख्या समस्या उद्‌भवतात. जर तुम्हालाही या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असेल, तर आहारामध्ये थोडा फार बदल करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यास हरकत नाही. जर बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल, तर आपल्या आहारामध्ये मुख्यत्वे फायबरची मात्रा जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याच अंतर्गत आणि सध्याच्या थंडीच्या मोसमामध्ये सर्वांना नक्कीच आवडेल अश्या मूग आणि पालक सूपचा समावेश आहारामध्ये करता येईल. हे सूप पचण्यास कठीण नसून, यामध्ये शरीरासाठी आवश्यक सर्व पोषक तत्वे आहेतच, त्याच्याच जोडीने पचनासाठी आवश्यक फायबरही या सूपद्वारे शरीराला मिळू शकते. हे सूप बनवण्यासाठी एक कप हिरवे मूग पाण्यामध्ये रात्रभर भिजत घालून ठेवावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी मूग पाण्यातून उपसून स्वच्छ धुवून घ्यावेत आणि प्रेशर कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावेत. एका भांड्यामध्ये थोडेसे तेल किंव साजूक तूप घालून त्यामध्ये एक चिरलेला कांदा, पालकाची पाने (दीड कप), थोडे आले, लसूणाच्या पाच सहा पाकळ्या, हळद आणि पाव चमचा कुटून घेतलेले धणे घालवेत. त्यानंतर यामध्ये आवडत असल्यास गाजराचे तुकडे, फ्लॉवरचे तुकडे, आणि थोडासा पुदिना घालून चांगले परतावे. भाज्या चांगल्या शिजल्या की शिजवून घेतलेले मूग यामध्ये घालून चांगले परतावेत. त्यानंतर गॅस बंद करून हे मिश्रण थंड होऊ द्यावे. मिश्रण थंड झाल्यानंतर थोडेसे पाणी घालून हे मिश्रण मिक्सरवर बारीक वाटून घ्यावे व चाळणीतून किंवा मोठ्या गाळणीतून गाळून घेऊन भाज्यांचा चोथा वेगळा करावा. गाळून घेतलेल्या मिश्रणामध्ये आवश्यक तेवढे पाणी घालून चवीपुरते मीठ आणि काळ्या मिऱ्याची पूड घालावी. सूपला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करावा.



## व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमधून घामाची दुर्गंधी अशी करा दूर

व्यायाम करीत असताना पुष्कळ घाम येत असतो. अंगावरील कपड्यांमध्ये हा घाम शोषून घेतला जात असतो. अंगावरील कपडे घामाने ओले झाले असता, त्यामध्ये व्यायाम सुरू ठेवणे अडचणीचे होऊ लागते. ही अडचण दूर करीत व्यायाम करताना घाम शोषून घेण्यासाठी आणि चटकन वाळण्यासाठी आजकाल 'ड्राय फिट' पद्धतीचे कपडे खास व्यायामप्रेमी मंडळींसाठी तयार करण्यात येत असतात. व्यायाम करताना वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे शरीरावरील घाम जरी शोषून घेतला जात असला, तरी अनेकदा या कपड्यांमधील घामाची दुर्गंधी मात्र कपडे धुतल्यानंतरही हटत नाही. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी काही उपायांचा अवलंब करता येऊ शकेल.

**आजकाल** व्यायामासाठी खास बनवण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये अतिशय सूक्ष्म छिद्रे असतात. पण शरीरावरील घाम, बाहेरील वातावरणातील प्रदूषण, किंवा धुळीचे कण, त्वचेचा तेलकटपणा, कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट इत्यादी कपड्यातून व्यवस्थित साफ न झाल्याने याचे कण या सूक्ष्म छिद्रांमध्ये अडकून राहतात आणि त्यामुळे कपडा धुतल्यानंतर त्यातून विशिष्ट दुर्गंधी येत राहते. ही दुर्गंधी हटवण्यासाठी सर्वप्रथम व्यायाम करून झाल्यानंतर जर कपडे घामाने थोडेच ओले झाले असतील, तर हे कपडे आधी हवेवर चांगले वाळू द्यावेत. कपडे धुण्यासाठी अधिक साबण वापरला तर कपडे अधिक स्वच्छ होतात हा गैरसमज आहे. वास्तविक प्रत्येक पद्धतीचा कपडा ठरावीक साबणाच्या मात्रेने स्वच्छ होणारा असतो. तसेच कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीनमध्ये देखील ठरावीक प्रमाणातच साबण वापरला जाणे आवश्यक असते. त्यामुळे यापेक्षा अधिक साबण वापरला गेल्यास कपडे खळबळून धुवूनही हा साबण त्यातून पूर्णपणे निघत नाही. कपड्यातील साबण पूर्णपणे काढून न टाकताच कपडा वाळवला गेला तर यामुळेही कपड्यामध्ये दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे साबणाचा आवश्यक तितकाच वापर केला जाणे आवश्यक आहे.



व्यायामाचे कपडे धुण्यासाठी 'फॅब्रिक सॉफनर'चा वापर करू नये. कपडे साबणाने धुतल्यानंतर ते न आकसता मुलायम आणि सुगंधी राहावेत याकरिता फॅब्रिक सॉफनरचा वापर करण्यात येतो. पण याचा वापर व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांसाठी केला असता, यामुळे कपड्यावरील सूक्ष्म छिद्रे बुजण्याची शक्यता असते. जर ही छिद्रे बुजली, तर कपडा स्वच्छ होत नाही आणि त्यातून दुर्गंधी येऊ लागते. त्याचप्रमाणे सॉफनरच्या वापराने कपड्याचा आकार आणि फिट बिघडण्याची देखील शक्यता असते. जर व्यायामाचे कपडे घामाने भिजून खूपच ओले झाले असतील तर मात्र हे कपडे हवेवर वाळू न देता त्वरित धुणे योग्य ठरते. कपडे धुण्यापूर्वी ते उलटे करावेत, यामुळे तुमच्या त्वचेच्या संपर्कात आलेला कपड्याचा भाग व्यवस्थित धुतला जातो. व्यायामाचे कपडे शक्यतो इतर कपड्यांच्या जोडीने धुणे टाळावे. तसेच हे कपडे धुताना पाण्यामध्ये थोडे व्हिनेगर घालून कपडे धुवावेत. व्हिनेगरमुळे कपड्यांमधील दुर्गंधी पूर्णपणे दूर होते. व्हिनेगरचा वापर करायचा असल्यास आधी एका बादलीमध्ये चार भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगरमध्ये कपडे भिजवून ठेवावेत आणि मग नेहमीप्रमाणे धुवावेत. कपडे धुतल्यानंतर हवेशीर ठिकाणी वाळवावेत. त्यामुळे कपड्यामधील दुर्गंधी नाहीशी होईल.

# एसआयआर आता २२ राज्यांमध्ये होणार
# नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी 'हे' कागदपत्रे तयार ठेवा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

बनावट मतदार याद्या रोखण्यासाठी आणि बनावट मतदारांची नावे वगळण्यासाठी, निवडणूक आयोगाने आता देशभरात विशेष सघन पुनरावृत्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. गुरुवारी ही घोषणा करण्यात आली असून निवडणूक आयोगाचे सचिव पवन दिवाण यांनी २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र लिहून रक्कम ची तयारी लवकरात लवकर पूर्ण करण्यास सांगितले. निवडणूक आयोगाने पत्रात म्हटले आहे की, दिल्ली आणि कर्नाटकसह २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर प्रक्रिया एप्रिलमध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात बिहारमध्ये एसआयआर आयोजित केला. त्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एसआयआर सुरू आहे, जो २८ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होईल. काही राज्यांसाठी अंतिम मसुदे प्रसिद्ध झाले आहेत, तर काहींमध्ये सुधारणा सुरू आहेत. यामध्ये मतदार यादीत नवीन मतदार जोडणे आणि मृत मतदारांना वगळणे समाविष्ट आहे. एसआयआर नियोजित असलेल्या राज्यांमध्ये, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये २०२७ मध्ये विधानसभा निवडणुका आहेत. तेलंगणामध्ये २०२८ मध्ये विधानसभा निवडणुका होतील.

### एसआयआर कुठे आयोजित केला जाईल अशा २२ राज्ये-केंद्रशासित प्रदेशांची यादी?

आंध्र प्रदेश अरुणाचल प्रदेश चंदीगड दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव हरियाणा हिमाचल प्रदेश जम्मू आणि काश्मीर झारखंड कर्नाटक लडाख महाराष्ट्र मणिपूर मेघालय मिझोरम नागालँड दिल्ली ओडिशा पंजाब सिक्कीम त्रिपुरा तेलंगणा उत्तराखंड

### स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन म्हणजे काय?

मतदार यादीतून नावे जोडण्याच्या आणि काढून टाकण्याच्या प्रक्रियेला विशेष सघन पुनरावृत्ती म्हणतात. ही निवडणूक आयोगाकडून कधी लहान प्रमाणात तर कधी मोठ्या प्रमाणात केली जाते. या प्रक्रियेत १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या नवीन मतदारांची भर पडते. मृत मतदारांची नावे मतदार यादीतून काढून टाकली जातात. याव्यतिरिक्त, ही प्रक्रिया मतदारांची नावे, फोटो, पत्ते इत्यादींमधील चुका दुरुस्त करते. निवडणूक आयोगाने १९५१ ते २००४ दरम्यान सुमारे आठ वेळा एसआयआर केले. शेवटचा एसआयआर २१ वर्षांपूर्वी, २००२ ते २००४ दरम्यान पूर्ण झाला होता.

### २२ राज्यांमध्ये एसआयआर कधी लागू होईल?

निवडणूक आयोगाने अद्याप या २२ राज्यांमध्ये एसआयआर सुरू होण्याची तारीख जाहीर केलेली नाही. सध्या, सर्व राज्यांमधील अधिकाऱ्यांना तयारी सुरू करण्यास सांगण्यात आले आहे. याचा अर्थ असा की राज्य अधिकारी एसआयआर आयोजित करण्यासाठी बूथ लेव्हल ऑफिसर्स (बीएलओ), मतदान केंद्रे इत्यादींना अंतिम स्वरूप देतील. त्यानंतर एक अधिसूचना जारी केली जाईल. या अधिसूचनेत एसआयआर सुरू करण्याच्या, मसुदा प्रसिद्ध



करण्याच्या, हरकती स्वीकारण्याच्या आणि अंतिम यादी प्रसिद्ध करण्याच्या तारखा नमूद केल्या जातील.

### देशात एसआयआरचा काय फायदा होईल?

एसआयआरचा प्राथमिक उद्देश परदेशी बेकायदेशीर स्थलांतरितांच्या जन्मस्थळाची पडताळणी करणे आणि त्यांना बाहेर काढणे आहे. बांगलादेश आणि म्यानमारसह विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर स्थलांतरितांवर कारवाई सुरू असल्याने हे पाऊल महत्त्वाचे आहे. बिहारनंतर इतर राज्यांमध्ये एसआयआर आयोजित केल्याने बनावट मतदार आणि फसव्या कारवाया उघड होण्यास मदत होईल. यामुळे प्रणालीमध्ये पारदर्शकता येईल. निवडणूक आयोगाने एसआयआरसाठी बिहारच्या २००३ च्या मतदार यादीचा वापर केला त्याप्रमाणे अंतिम एसआयआर कट-ऑफ डेट म्हणून काम करेल. बहुतेक राज्यांनी २००२ ते २००४ दरम्यान शेवटचे एसआयआर केले होते. दिल्लीने २००८ मध्ये आणि उत्तराखंडने २००६ मध्ये एसआयआर केले होते.

मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, एसआयआरसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर १ हजार मतदार नियुक्त करण्यात आले आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर एक बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) असेल. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात अनेक मतदान केंद्रे स्थापन केली जातील. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात एक निवडणूक नोंदणी अधिकारी (ईआरओ) असेल. ईआरओ हा मूलतः उपविभागीय दंडाधिकारी (एसडीएम) दर्जाचा अधिकारी असेल. याव्यतिरिक्त, प्रत्येक तहसीलमध्ये सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी असतील. ईआरओच्या निर्णयाविरुद्धचे पहिले अपील जिल्हा दंडाधिकाऱ्यांसमोर ऐकले जाईल, तर दुसरे अपील राज्य/केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऐकतील.

### कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?

एसआयआर दरम्यान, तुम्हाला तुमची ओळख आणि निवासी पत्ता यांचा पुरावा द्यावा लागेल. वैध कागदपत्रांमध्ये तुमचे आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, रेशन कार्ड, निवास प्रमाणपत्र, वीज, पाणी किंवा गॅस बिल, बँक पासबुक, मनरेगा जॉब कार्ड आणि २००२ च्या मतदार यादीची प्रत समाविष्ट आहे. तुमची ओळख आणि कायमचा पत्ता पडताळण्यासाठी हे कागदपत्रे आवश्यक आहेत.

### कागदपत्रे दाखवण्यापासून कोणाला सूट दिली जाईल?

ज्यांची नावे २००२ च्या यादीत आहेत त्यांना फक्त फॉर्म आणि २००२ च्या यादीची प्रिंटआउट सादर करावी लागेल. इतर कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. जर एखाद्या मतदाराचे नाव २००२ च्या मतदार यादीत नसेल, परंतु त्यांच्या पालकांची नावे यादीत असतील, तर त्यांना ओळखपत्र आणि त्यांच्या पालकांची नावे २००२ च्या यादीत असल्याची पुष्टी करणारे प्रमाणपत्र मतमोजणी फॉर्मसोबत सादर करावे लागेल.

### जर मी कागदपत्रे दाखवली नाहीत तर माझे नाव मतदार यादीतून काढून टाकले जाईल का?

नाही, फक्त कागदपत्रे न दिल्याने मतदार यादीतून नाव वगळले जाणार नाही. बीएलओ मतदाराशी संपर्क साधेल. जर व्यक्तीची ओळख आणि कायमचे निवासस्थान पडताळता आले नाही तरच नियमांनुसार पुढील कारवाई केली जाईल. आयोगाच्या मते, ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आहे आणि प्रत्येक मतदाराला संधी दिली जाईल.

### जर नाव वगळले तर मी कुठे तक्रार करू?

जर तुमचे नाव मतदार यादीतून काढून टाकले गेले असेल, तर तुम्ही प्रथम ऑनलाइन तक्रार दाखल करू शकता. हे करण्यासाठी, राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टलला भेट द्या आणि 'तक्रार नोंदवा' किंवा 'सूचना शेअर करा' विभागात लॉग इन करा. एकदा लॉग इन केल्यानंतर, तुमची तक्रार सबमिट करा. जर तुमचे आधीच खाते नसेल, तर तुम्हाला वेबसाइटवर एक खाते तयार करावे लागेल.

**नागरिकत्व पडताळणीसाठी कोणते कागदपत्रे वैध आहेत?**


- **जन्म प्रमाणपत्र :** मतदार ओळखपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेले हे सर्वात महत्त्वाचे कागदपत्र आहे. जन्म प्रमाणपत्र हे सिद्ध करते की तुमचा जन्म भारतात झाला आहे आणि तुम्ही भारताचे नागरिक आहात. जन्म प्रमाणपत्र महानगरपालिका, पंचायत किंवा मान्यताप्राप्त सरकारी संस्थेने जारी केले पाहिजे.
- **पासपोर्ट :** ओळखपत्र म्हणून भारत सरकारने जारी केलेला वैध पासपोर्ट आवश्यक आहे. मतदार कार्डसाठी अर्ज करण्यासाठी तुम्ही हे ओळखपत्र म्हणून सादर करू शकता.
- **हायस्कूल मार्कशीट किंवा प्रमाणपत्र :** हे तुमचे ओळखपत्र म्हणून देखील काम करू शकते. त्यात तुमची जन्मतारीख असते. तुमचे हायस्कूल मार्कशीट किंवा प्रमाणपत्र मान्यताप्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठाने जारी केलेले असणे आवश्यक आहे.
- **सरकारी सेवा ओळखपत्र किंवा पेन्शन ऑर्डर :** जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला किंवा पेन्शनधारकाला मतदार कार्ड बनवायचे असेल तर हे कागदपत्र त्यांच्यासाठी आहे.
- **कायमस्वरूपी रहिवासी पुरावा :** हा जिल्हा दंडाधिकारी (डीएम) किंवा अशा अधिकाऱ्याने जारी केला पाहिजे.
- **वन हक्क प्रमाणपत्र:** आदिवासी किंवा वनक्षेत्रात राहणाऱ्या लोकांसाठी हे एक महत्त्वाचे दस्तऐवज आहे.
- **जात प्रमाणपत्र :** हे दस्तऐवज समाज कल्याण विभाग किंवा अशा अधिकाऱ्याने जारी केले पाहिजे.
- **एनआरसी दस्तऐवज :** हा राष्ट्रीय नागरिक नोंदणी अंतर्गत जारी केलेला दस्तऐवज आहे.
- **कुटुंब नोंदणी :** तुम्ही ते महानगरपालिका किंवा ग्रामपंचायतसारख्या सार्वजनिक संस्थेकडून बनवू शकता.
- **जमीन किंवा घर वाटप पत्र :** हे कोणत्याही सरकारी विभागाने जारी केलेले दस्तऐवज आहे.
- **पीएसयू कार्ड :** हे १९८७ पूर्वी सरकारी विभागात किंवा सार्वजनिक क्षेत्रातील युनिटमध्ये (पीएसयू) नोकरी करणाऱ्यांना दिले जात होते.
- **आधार कार्ड :** आतापर्यंत मतदार यादीत नावे जोडण्यासाठी फक्त वर सूचीबद्ध केलेली कागदपत्रे वैध होती, परंतु अलीकडील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, आधार कार्ड देखील वैध कागदपत्रांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. ते यादीत १२ व्या क्रमांकावर ठेवण्यात आले आहे.

## मुंबई ते विजयदुर्ग रोरो सेवा १ मार्चपासून... मंत्री नितेश राणे पहिल्या फेरीने करणार प्रवास

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बहुचर्चित आणि बहुप्रतीक्षित रोरो सेवेला अखेर मुहूर्त मिळाला आहे. येत्या १ मार्चपासून मुंबई ते विजयदुर्ग पर्यंत रोरो सेवा नियमितपणे सुरू होणार आहे. मुंबईतील भाऊचा धक्का येथून विजयदुर्गपर्यंत जाणारी ही रोरो सेवा मुंबईझ्र कोकण प्रवास अधिक सोपा आणि जलद करणार आहे. यामुळे कोकण पर्यटनाला चालना मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्याचे बंदरे विकास मंत्री नितेश राणे हे स्वतः पहिल्या फेरीतून प्रवास करणार आहेत.

बहुप्रतीक्षित रोरो सेवा १ मार्च रोजी सुरु होणार आहे. मुंबईतील भाऊचा धक्का येथून १ मार्च रोजी सकाळी ८ वाजता मुंबईहून रोरो सुटणार असून दुपारी ३ वाजता विजयदुर्ग येथे पोहोचणार आहे. तर परतीच्या प्रवासात २ मार्च रोजी



विजयदुर्गहून दुपारी १२ वाजता सुटणारी रोरो सायंकाळी ७ वाजता मुंबईत दाखल होईल. या सेवेला बंदरे विकास मंत्री नितेश राणे स्वतः पहिल्या फेरीत उपस्थित राहणार आहेत. मंत्री नितेश राणे यांनी रोरो सेवेच्या पहिल्या फेरीच्या प्रवासासाठी तिकीटही आरक्षित केले आहे.

ही सेवा महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्यावतीने सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे मुंबईझ्रकोकण दरम्यानचा

**कसे असतील तिकिट दर?**

या सेवेसाठी तिकिट दर अद्याप निश्चित केले नाही आहेत. परंतु, प्राथमिक अंदाजानुसार साधारणपणे ८०० ते १२०० रुपये प्रति प्रवासी तिकिट दर असू शकतात. शिवाय दुचाक्यांसाठी १००० रुपये तर चारचाकीसाठी ४५०० ते ६००० रुपये इतके तिकिट दर असू शकतात. गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्यांची संख्या मोठी असते. त्यामुळे ऑगस्टमध्ये गणेशोत्सवाच्या काही दिवसांपूर्वी ही सेवा सुरु होणार होती. पण तांत्रिक अडचणींमुळे हे काम त्यावेळी पूर्ण झाले नाही. तेव्हापासून नागरिक या सेवेच्या प्रतीक्षेत आहेत.

प्रवास वेळेत आणि सुलभ होण्यास मदत होणार आहे. तसेच कोकणातील पर्यटन क्षेत्राला यामुळे मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांना रोरो सेवा अधिक सोयीस्कर आणि लाभदायक ठरण्याची शक्यता आहे. यामुळे प्रवास सोयीस्कर होणार असून महत्त्वाची जलवाहतूक सुविधा आता सिंधुदुर्गकरांसाठी उपलब्ध होत आहे. या सेवेमुळे प्रवाशांना जलमार्गाने जलद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव करता येईल.

एम2एम प्रिन्सेस या बोटीचा मार्च महिन्यातील संपूर्ण शेड्यूल समोर आला आहे. १ मार्च मुंबई ते विजयदुर्ग २ मार्च रोजी विजयदुर्ग ते मुंबई पुन्हा ४ मार्च रोजी मुंबई ते विजयदुर्ग आणि ५ मार्च रोजी विजयदुर्ग ते मुंबई असा प्रवास करता येणार आहे. १ ते २६ मार्च पर्यंतचे वेळापत्रक समोर आले आहे. प्रवाशांनी रोरो सेवेच्या नियोजित वेळेच्या ९० मिनिटे आधी बंदरावर उपस्थित राहावे असे आवाहन प्रशानाच्यावतीने करण्यात आले आहे. हवमान आणि तांत्रिक कारणांमुळे वेळापत्रकात बदल होण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## व्हॉट्सअॅप स्टेटसवर महात्मा फुले दांपत्यांचा अवमान
## पुण्यातील विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**■पुणे। प्रतिनिधी,**

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्याबाबत व्हॉट्सअॅपवर अवमानकारक स्टेट्स ठेवण्यात आला होता. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या आणि भाजप नेत्या अदिती गणेश बाबर यांनी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी संबंधितावर गुन्हा दाखल केल्याचे सांगण्यात येत आहे.

### आदिती बाबर यांनी व्हॉट्सअॅपवर पाहिला व्हिडिओ

तक्रारीनुसार, नाशिक जिल्ह्यातील बॉम्बे नाका परिसरातील महात्मा फुले दांम्पत्यांच्या स्मारकाजवळ तरुणाने व्हिडिओ रेकॉर्ड केला. त्या व्हिडिओत महापुरुषांबाबत अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला होता. आदिती बाबर यांनी संबंधित व्हिडिओ व्हॅट्सअॅप स्टेट्सवर पाहिला. व्हॉट्सअॅप स्टेट्स ठेवलेल्या तरुणाचे नाव कृष्णा चौधरी असे आहे.

### महापुरुषांचा जाणीवपूर्वक अवमान केल्याचा आरोप

आदिती बाबर यांनी दिः १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ८ वाजता स्टेट्स पाहिल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याचे तक्रारीत नमूद केले. या प्रकरणात महापुरुषांचा जाणीवपूर्वक अवमान करून त्यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचा आरोप आहे. या घटनेप्रकरणी कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलिसांकडे केली.

दरम्यान, कोणत्याही महामानवाचा अपमान करण्याचा प्रयत्न झाल्यास तो सहन केला जाणार नाही, असा इशारा आदिती बाबर यांनी दिला. संबंधित प्रकरणात तक्रार नोंदवताना संध्या शिंदे व महेश पाटील हे घटनास्थळी उपस्थित होते. या प्रकरणाचा तपास विश्रांतवाडी पोलीस करत आहेत.

## ३७ वर्षीय महिलेवर ३४ वर्षीय तरुणाचा बलात्कार...
## तिच्या मुलीसोबत देखील अश्लील कृत्य! प्रॉपर्टी डीलर अटकेत

**■नागपुर। प्रतिनिधी,**

नागपुरात एका महिलेवर बलात्कार करून तिच्या अल्पवयीन मुलीसोबत देखील अश्लील कृत्य करण्यात आल्याचं धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं आहे. संबंधित घटना इमामवाडा पोलीस स्टेशन हद्दीत घडली असून या टाटा कॅपिटल हाइट्स येथील रहिवासी असलेल्या आरोपी प्रीतम वानखेडे (34) या तरुणाला अटक करण्यात आली आहे. 37 वर्षीय पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, 2015 मध्ये तिचं लग्न झालं असून तिचा पती कामानिमित्त दुबईत राहतो. खरं तर, पती आणि पत्नीमध्ये सतत मदभेद सुरू होते आणि त्यामुळे ती तिच्या मुलांसोबत पतीपासून वेगळी राहत होती.

### लग्नाचं आश्वासन देऊन शारीरिक संबंध...

आरोपी वानखेडे हा प्रॉपर्टी डीलर असल्याचा दावा केला असून तो प्लॉट म्हणजेच जमीन खरेदी करण्याच्या निमित्ताने पीडितेला भेटला. कालांतराने, त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले.




**पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल**

इतकेच नव्हे तर, त्यानंतर आरोपीने ब याच ठिकाणी पीडितेसोबत शारीरिक संबंध ठेवले. धक्कादायक बाब म्हणजे त्याने पीडित महिलेच्या मुलीसोबत सुद्धा अश्लील कृत्य केलं. महिलेने त्याच्यावर लग्नासाठी दबाव आणल्यास तिला मारहाण देखील करण्यात आल्याचा आरोप आहे. यासंबंधी पीडितेने इमामवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपीविरुद्ध बलात्कार तसेच पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपी वानखेडेला ताब्यात घेतलं आहे.

दरम्यान, आरोपी तरुणाने संबंधित महिलेला सांगितलं की, त्याचे त्याच्या पत्नीशी सुद्धा वाद होत असतात. त्यामुळे, आपल्या पत्नीला घटस्फोट देऊन पीडितेसोबत लग्न करणार असल्याचं त्याने तिला आश्वासन दिलं होतं. मार्च 2024 मध्ये आरोपी पीडित महिलेला टाटा कॅपिटल हाईट्समधील त्याच्या फ्लॅटमध्ये घेऊन गेला आणि तिथे त्याने तिच्यासोबत बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

## सून आणि तिच्या प्रियकराचं सासऱ्याने घडवून आणलं मिलन, पण नंतर केली 'डर्टी डिमांड'

**■मुंबई। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील शामली येथे नातेसंबंधातून धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कैराना येथे सासऱ्याने सुनेकडे लैंगिकसंबंध ठेवण्याची मागणी केली. सुनेनं याला विरोध केला असता, सासऱ्याने सूनेची हत्या केली. या हत्येमागील खरं रहस्य दाखवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. १४ फेब्रुवारी रोजी कैराना पोलीस ठाणे परिसरातील इस्सोपूर खुरगान गावात मुस्कारा नावाच्या महिलेचा मृतदेह तिच्या बंद खोलीत आढळून आला होता. मृत महिलेचे सासरे अब्बास यांनी ही

**व्हेलेंटाईन डे च्या रात्री, सासऱ्याने सुनेकडे नको त्या मागण्या केल्या**

अब्बास आपल्या सुनेवर लक्ष ठेवून होता, त्याने तिचा विश्वास देखील मिळवला. त्याने सुनेच्या एक्स गर्लफ्रेंडला घरी बोलावण्याची परवानगी दिली होती. व्हेलेंटाईन डे च्या रात्री, सासऱ्याने सूनेकडे नको त्या मागण्या केल्या. त्यानंतर तिने त्या मागण्या नाकारल्या, तेव्हा अब्बासने तिचा गळा दाबून तिची हत्या केली. पुरावे लपवण्यासाठी सहभागी असलेल्या त्याच्या मुलाला सलमानलाही पोलिसांनी अटक केली.



आत्महत्या असल्याचा दावा केला होता, परंतु पोलीस तपासातून भयानक हत्या असल्याचे उघड झाले.

पोलीस तपासातून समोर आले की, अब्बासने मुस्कुरावर वडिलांप्रमाणे प्रेम करण्याचे नाटक करून तिचा विश्वास संपादन केला. गप्पा मारताना तिच्या एक्स बॉयफ्रेंडची माहिती देखील मिळवली. अब्बासने तिचा नवरा परदेशात आहे असे पटवून दिले, याचमुळे सुनेनं प्रियकराला घरी बोलवू लागला.

व्हेलेंटाईन डेच्या रात्री तिचा प्रियकर निघून गेल्यानंतर अब्बासने हुशारीने काठीला तार बांधून खोलीच्या आतील दरवाजा उघडला होता. अब्बास खोलीत गेला असता, त्याने सुनेशी लैंगिक संबंध ठेवण्याची मागणी केली. मुस्कुराने जोरदार विरोध करून देखील वासनेनं आंधळ्या झालेल्या सासऱ्याने तिचा गळा दाबून संपवलं. हत्येनंतर अब्बासने मुलगा सलमानला फोन करून सांगितले की, प्रेमसंबंध आहेत. हे प्रकरण लपवण्यासाठी आणि पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी एक कट रचला. सकाळी अब्बासने दावा केला की, त्याच्या सुनेने स्वतःला एका खोलीत कोंडून घेत आत्महत्या केली. त्याने पोलीस आणि कुटुंबावर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी दबाव आणला.



**दिराने वहिनीच्या बेडरूमकडे लावला सीसीटीव्ही, वहिनीला समजल्यावर घडलं भलतंच!**

आग्रा येथील ट्रान्स-यमुना परिसरात राहणाऱ्या एका विवाहित महिलेनं कपिल देव नावाच्या तरुणाशी विवाह केला होता. त्यानंतर महिलेचा संसार सुरळीत सुरु होता. माहेरच्या मंडळींनी मुलीच्या लग्नात मोठा खर्च देखील केला होता. याच खर्चामुळे, सोने- चांदीमुळे विवाहित पीडितेला दुःखाचा सामना करावा लागला आहे. सासरी दीरानेच आपल्या वहिनीच्या खोलीत सीसीटीव्ही कॅमेरा लावल्याने एक भयंकर प्रकरण समोर आले. आरोपी आहे की, लग्नानंतर नवरा आणि सासरच्या मंडळींचा खरा चेहरा समोर आला. बुलेट, एक चार चाकी कार आणि २ लाख रुपये रक्कम पाहिजे होती. याच मागणीला घेऊन सुनेला दररोज टोमणे मारले जात होते, नंतर तिच्याशी मारहाण आणि गैरवर्तन केले जात आहे. याचाच राग मनात ठेवून रागाच्या भरात विवाहितेनं दोन मुलांची हत्या केली. मृत तरुणाचे नाव कुणाल (४) आणि रियांश वय (४ महिने) अशी नावे आहेत. या प्रकरणात एक मोठा ट्विस्ट निर्माण झाला असता, पीडितेला कळले की, तिच्या मेहुण्याने घरात सीसीटीव्ही कॅमेरे लावले. त्या कॅमऱ्याची दिशा ही स्वयंपाक घर आणि बेडरूमकडे होती. ५ नोव्हेंबर रोजी क्रूरतेचा कळस गाठला. या दिवशी पती, मेहुणे, सासरे, सासू आणि मेहुणी यांनी पीडितेला बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे.

## अंगावर काळे कपडे, पिज्झा अन्... निर्जन रानात २५ वर्षीय तरुणीबरोबर काय घडलं? महामार्गालगत बॉडी आढळली




**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक-मुंबई महामार्गालगत असलेल्या वाडीवरे पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २५ वर्षीय तरुणीची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सर्व शिवारातील एका निर्जन रानात या तरुणीचा रक्ताच्या थारोळ्यातील मृतदेह आढळून आल्याने परिसरात दहशतीचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### तपासाचा धागादोरा काय?

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असता, मयत तरुणीच्या मृतदेहाजवळ पिज्झाचे बॉक्स आणि काही खाद्यपदार्थ आढळून आले आहेत. ही तरुणी कोणासोबत तरी येथे आली होती का? किंवा तिने जेवण मागवले होते का? या दिशेने आता पोलीस तपास करत आहेत. या तरुणीच्या अंगावर काळ्या रंगाचे कपडे असून, मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही. ही हत्या येथेच करण्यात आली की अन्यत्र हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह येथे आणून टाकला, याचा शोध पोलीस घेत आहेत.

### पोलिस अधीक्षकांचे आवाहन

नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी घटनास्थळाला भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या आहेत. त्यांनी सांगितले की, "या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी वाडीवरे पोलिसांची विविध पथके तयार करण्यात आली आहेत. तांत्रिक पुरावे आणि घटनास्थळावरील वस्तूंवरून आरोपींचा शोध सुरू आहे." तसेच, सदर वर्णनाची कोणतीही तरुणी बेपत्ता असल्यास नागरिकांनी तातडीने वाडीवरे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही नाशिक ग्रामीण पोलिसांनी केले आहे.

सध्या वाडीवरे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू आहे. या थरारक हत्याकांडाने संपूर्ण नाशिक जिल्हा सुन्न झाला असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी केली जात आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक-मुंबई महामार्गापासून जवळच असलेल्या एका निर्जन भागात आज सकाळी स्थानिकांना एक मृतदेह दिसून आला. नागरिकांनी तात्काळ या घटनेची माहिती वाडीवरे पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, साधारण २५ वर्ष वयोगटातील एक तरुणी रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडलेली होती. प्रथमदर्शनी या तरुणीवर धारदार शस्त्राने वार करून तिची हत्या करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com